# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
## राष्ट्रीय छात्र सेना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

लेफ्ट. आशिष सांगळे

संपर्क : +९१७०२८९९११८१

: ०२० – २५६२२६८३


**संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/०३२** **दि. २७/०८/२०२६**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.**

**विषय : एस.एस.बी. प्रशिक्षण (SSB Capacity Building) कार्यशाळेकरीता नावनोंदणी करणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विस्तार विभागास दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ पासून राष्ट्रीय छात्र सेना तुकडीची मान्यता मिळाली आहे. सदर तुकडीमार्फत विद्यार्थ्यांवर एकता व स्वयंशिस्त तसेच श्रम-संस्कार, कौशल्य, सर्वांगीण विकास व चारित्र्य विकास संस्कार देखिल व्हावेत या हेतूने विद्यार्थ्यांना सहाय्यभूत ठरणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभाग लाभत असतो. एस.एस.बी. (SSB) सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड ही भारतात लष्कर, नौदल आणि हवाई दलातील अधिकारी पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यासाठी वापरली जाणारी ५ दिवसांची व्यापक व्यक्तिमत्व आणि बुद्धिमत्ता चाचणी आहे. यामध्ये मानसशास्त्रीय चाचण्या, गट कार्ये (GTO) आणि वैयक्तिक मुलाखती यांचा समावेश असतो व विद्यार्थ्यांचे नेतृत्व, निर्णय क्षमता आणि सहनशक्ती यासारख्या १५ कौशल्यांचे (OLQ) मूल्यांकन करण्यासाठी यांचा उपयोग होतो.

माहे फेब्रुवारी – मार्च, २०२६ या कालावधीत पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक या तीनही जिल्ह्यांमध्ये एकदिवशीय एस.एस.बी. प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय छात्र सेना तुकडीमार्फत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधील राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट यांच्याकरिता आयोजित करण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय छात्र सेना तुकडीमार्फत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधील राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट अथवा इच्छुक विद्यार्थी यांच्याकरिता नि:शुल्क एस.एस.बी. प्रशिक्षण (SSB Capacity Building) कार्यशाळा आयोजित करण्याचे योजिले आहे. सदर १० दिवसांची कार्यशाळा दि. २६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीमध्ये विद्यापीठ परिसरामध्ये आयोजीत करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील एस.एस.बी. प्रशिक्षणासाठी इच्छुक असलेले विद्यार्थी यांची एस.एस.बी. प्रशिक्षण (SSB Capacity Building) कार्यशाळेकरीता आपल्या महाविद्यालयाच्या BOD लॉगीन द्वारे (www.unipune.ac.in – BOD – BOD online – Login – User Name & Password – Online Services – NCC – SSB Capacity Building Registration) या ऑनलाईन (Online) प्रणालीद्वारे भरलेल्या माहितीची प्रिंट काढून त्यावर सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.)/(सी.टी.ओ) आणि प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी असलेल्या माहितीची प्रत स्कॅन करून तिथेच दि. ०४ सप्टेंबर, २०२६ रोजी दु. ०३.०० वाजेपर्यंत अपलोड करावी.

कळावे, ही विनंती.

**(ले. आशिष सांगळे),**
सहयोगी एनसीसी अधिकारी,
राष्ट्रीय छात्र सेना

**(डॉ. सविता कुलकर्णी),**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**तांत्रिक अडचणीसाठी :**
**रा. छा. से कार्यालय संपर्क क्र. : ०२०२५६२२६८३.**
**मेल आयडी : nccsupport@unipune.ac.in**

**अत्यंत महत्वाच्या सूचना :**

१. सदर कार्यशाळा ही सर्व विद्यार्थ्यांकरिता नि:शुल्क असेल.
२. सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवास, भोजन व निवास व्यवस्थेची जबाबदारी सहभागी विद्यार्थ्यांची असेल.
३. एस.एस.बी. प्रशिक्षण (SSB Capacity Building) कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची १० दिवसांची उपस्थिती अनिवार्य असेल.
४. विद्यार्थ्यांची नावनोंदणी महाविद्यालयातील सहयोगी एनसीसी अधिकारी (ए.एन.ओ.)/(सी.टी.ओ.) यांनीच करावी.
५. विद्यार्थ्यांची नावनोंदणी करताना प्रामुख्याने व प्राधान्याने अशी नाव पाठवावे ज्यांनी यापूर्वी SSB ची परीक्षा दिली आहे अथवा तयारी करत आहे.